# कल्याण वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९६ /२०२६ दि. २३/०१/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

**ज्याअर्थी**, कल्याण वाहतूक उपविभागाचे हद्दीत कल्याण डोंबिवली महानगरपालीका सार्वत्रिक निवडणुक २०२६ चे मतदान दिनांक १५/०१/२०२६ रोजी होणार आहे. त्याअनुषंगाने कल्याण पश्चिम परीसरातील मतदारसंघातील मतदान प्रक्रीयाचे साहीत्य वाटप, मतदान साहीत्य स्विकृती तसेच मतमोजणी **१) 'अ' वार्ड बिर्ला वन्या, शहाड २) 'ब' वार्ड, मुंबई विदयापीट, वसंत व्हॅली ३) 'क' वॉर्ड अग्नीशामक कार्यालय, सोनावणे कॉलेज समोर, कल्याण पश्चिम** येथे महानगर पालीकेच्या कार्यालयाचे ठिकाणी **दिनांक १४/०१/२०२६ रोजी ते दिनांक १६/०१/२०२६ रोजी दरम्यान पार पडणार आहे.** त्यामुळे नमुद परिसरात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालील प्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | १) वाडेघर चौका कडुन दुर्गामाता चौक (दुर्गाडी) कडे जाणाऱ्या एकतर्फा रस्त्यावर सर्व प्रकारच्या वाहनांना वाडेघर चौक येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने हि दुर्गामाता चौक (दुर्गाडी) कडुन वाडेघर चौकाकडे येणाऱ्या रस्त्याचे वाहिनी वरून पुढे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | २) प्रेम ॲटो चौक कडुन शहाड व उल्हासनगर कडे जाणारा एकतर्फा रस्त्यावर सर्व प्रकारच्या वाहनांना योगीधाम कडुन येणाऱ्या कटजवळ येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने ही शहाड व उल्हासनगर कडुन प्रेम ॲटो चौक कडे येणाऱ्या वाहिनी वरून पुढे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ३) महाराज अग्रसेन चौक कडून डिमार्ट कडे (वसंत व्हॅली) जाणाऱ्या रस्त्यावर सर्व प्रकारच्या वाहनांना महाराज अग्रसेन चौक येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने हिना गार्डन को.ऑप सोसायटीच्या बाजुकडील जाणाऱ्या वाहिनीवरून पुढे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ४) वसंत व्हॅली रोडवरील वेलनेस फॉरेव्हर केमिस्ट शॉप कडून मुंबई विदयापीठ,कल्याण उपकेंद्रा कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना फॉरेव्हर केमिस्ट शॉप समोरील चौकात येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने कडोंमनपा बस आगार– गणपती चौक मार्गे–गांधारी रोड मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **नो पार्कींग –** | शहाड व उल्हासनगर कडुन प्रेम ॲटो कडे येणारा संपुर्ण रस्ता तसेच शहाड नाका ते मोहनखेडा बिल्डीग पर्यंतचा संपुर्ण रस्ता हा 'नो पार्किंग' झोन करण्यात येत आहे. |

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना **दिनांक १४/०१/२०२६ रोजी सकाळी ०८.०० ते सायंकाळी १८.०० वा तसेच दिनांक १५/०१/२०२६ रोजी सायंकाळी १७.०० वा. ते दिनांक १६/०१/२०२६ रोजी मतमोजणी प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत** अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर .
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
– मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
– मा. जिल्हाधिकारी, ठाणे
– मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली/उल्हासनगर महानगरपालिका
– मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर.
– उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.
– परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली, महानगरपालिका
– विभाग नियंत्रण, राज्य परिवहन विभाग, ठाणे, कल्याण/विठठलवाडी.
– नियंत्रण कक्ष, ठाणे शहर.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :– सपोआ, कल्याण, उल्हासनगर वाहतूक विभाग व प्रभारी अधिकारी, कल्याण/कोळशेवाडी/विठठलवाडी/उल्हासनगर वाउपवि.